MHAH190000312025

**नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२५**

श्रीधर रोहिदास काकडे

वि.

चंद्रकला कल्याण काकडे व इतर

## निशाणी क्र.१३ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र.२० मयत झाल्यामुळे तिचे विरुध्द दावा अबेट झाला आहे. सदर अबेटमेंट सेटअसाईड करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे या दिनांक १६/०२/२०२५ रोजी मयत झाली. वादी आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने प्रतिवादी क्र.२० चे वारस रेकॉर्डवर आणता आले नाही. त्यामुळे दावा प्रतवादी क्र.२० विरुध्द अबेट झाला आहे. त्यामुळे अबेटमेंट सेटअसाईड होऊन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अक्षेप नोंदविला.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांचे बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.२० चे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे यांचे दिनांक १६/०२/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा वाद मिळकतीचे वाटप होऊन तुटक कब्जा मिळणेसाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे यांचा मृत्यू दिनांक १६/०२/२०२५ रोजी झाला असुन वादीच्या कथनानुसार वादीस आवश्यक कागदपत्र वेळेत उपलब्ध न झाले नाहीत. मुदत कायदा अर्टिकल १२० नुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. मृत्यू दि.१६/०२/२०२५ नंतर ९० दिवसांमध्ये प्रतवादी क्र.२० चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते, परंतु, वादीने ९० दिवसांत प्रतवादी क्र.२० चे वारस रेकॉर्डवर घेतले नाही. त्यामुळे सदरचा दावा प्रतवादी क्र.२० विरुध्द अबेट झाला

आहे. तसेच सदर अबेटमेंट सेट असाईड करण्यासाठी झालेला विलंब अर्ज निशाणी क्र. ११ वरील आदेशाने माफ झालेला आहे.

६. प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे या मयत झाल्या असल्या तरी त्यांच्या वारसा विरुध्द वादीचा दावा दाखल करण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा परिपूर्णपणे व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज निशाणी क्र.१३ प्रतिवादीस रु.२००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येऊन प्रतवादी क्र.२० विरुध्द दावा अबेटमेंट सेट असाईड करण्यात येतो.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.11 18:01:19 +0530

दि.११/०३/२०२६

( वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
शेवगाव.